भूसंपादन प्रारुप निवाड्यास पूर्वमान्यता देण्याकरीता उच्चस्तरीय समिती पुर्नगठीत करणेबाबत...

महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः- संकीर्ण-२०२६/प्र.क्र.२०/भूसंपादन-०४
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांकः- २१ जुलै, २०२६

वाचा:- १. शासन अधिसूचना क्र.एलक्यूएन-२०२२/प्र.क्र.८२/अ-२, दि.११.०१.२०२४.
२. शासन निर्णय क्रमांक:-संकीर्ण-२०२५/प्र.क्र.३१/भूसंपादन-४, दि.३०/०१/२०२६
३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण १३२६/प्र.क्र.६८/ प्रशा-१, दि.२४/०६/२०२६.

प्रस्तावना :-

शासन अधिसुचना दि.११.०१.२०२४ अन्वये भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम,२०१४ मधील नियम (१८) उप-नियम (३) नुसार ज्या भूसंपादन प्रकरणी द्यावयाची भरपाईची रक्कम ही शंभर कोटी रुपयांपेक्षा अधिक असेल तर जिल्हाधिकारी, संबंधित महसुली विभागाच्या विभागीय आयुक्तांमार्फत प्रारूप निवाडा पूर्व मान्यतेस्तव राज्य शासनास सादर करील आणि राज्य शासनाची पूर्वमान्यता प्राप्त झाल्यानंतरच जिल्हाधिकारी निवाडा घोषित करील, अशी तरतुद करण्यात आली आहे.

०२. यास्तव शासन स्तरावरील प्रारुप निवाड्याच्या प्रस्तावाची जलदगतीने छाननी होवून गुणवत्तेवर निर्णय होण्यासाठी संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये मा. अपर मुख्य सचिव (वने, भूसंपादन) यांच्या स्तरावर गठीत करण्यात आलेली उच्चस्तरीय समिती दि.२४/०६/२०२६ रोजीच्या मंत्रालयीन विभागाच्या पुनर्रचनेच्या पार्श्वभूमिवर अधिक्रमित करुन मा. अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती पुर्नगठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

शासन स्तरावरील प्रारुप निवाड्याच्या प्रस्तावाची जलदगतीने छाननी होवून गुणवत्तेवर निर्णय होण्यासाठी आता शासन मा.अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली पुढीलप्रमाणे उच्चस्तरीय समिती पुर्नगठीत करीत आहे.

<u>समितीची संरचना :-</u>

१) अपर मुख्य सचिव (महसूल)	- अध्यक्ष
२) अपर मुख्य सचिव (वने)	- सदस्य
३) अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम)	- सदस्य
४) अपर मुख्य सचिव (कृषी)	- सदस्य
५) प्रधान सचिव (विधी व न्याय विभाग)	- सदस्य
६) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (भूसंपादन मंडळाचे / प्रशासकीय विभाग प्रमुख)	- सदस्य
७) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक	- सदस्य
८) सहसंचालक, नगर रचना व मुल्यनिर्धारण विभाग	- सदस्य
९) संबंधित जिल्हाधिकारी	- सदस्य
१०) सह सचिव (भूसंपादन)	- सदस्य सचिव

०२. सदर उच्चस्तरीय समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहिल.

I. शासनस्तरावर प्राप्त होणाऱ्या प्रारूप निवाडयाची प्रचलित अधिनियम/नियमामधील तरतुदीनुसार छाननी करून समिती शासनास मान्यतेसाठी शिफारस करील.

II. तसेच प्रारूप भूसंपादन निवाडयातील जमिनी व्यतिरिक्त अन्य बाबींच्या मूल्यांकनासाठी संबंधित विषयातील सक्षम अधिकारी अथवा तज्ञ अधिकारी यांना विशेष निमंत्रित म्हणून बैठकीस आमंत्रित करता येईल.

III. विवक्षित प्रकरणी भूसंपादन प्रस्तावामधील संबंधित संपादन संस्थेचे प्रमुख यांना देखील आवश्यकतेनुसार निमंत्रित सदस्य म्हणून बैठकीस आमंत्रित करता येईल.

०३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२६०७२११६३०५८७८४८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

KIRANCHANDRA
DNYANESHWAR
MALGAONKAR

Digitally signed by KIRANCHANDRA DNYANESHWAR MALGAONKAR
DN: c=IN, o=Personal,
2.5.4.20=8ECC402734867FA62CA0BC7B358669216D092AE4AD1B0BE28B3A38706CE2587D, postalCode=400078, st=Maharashtra,
serialNumber=76C41C06881F261C140BC74BF1EA65314D16D9F72D602BAB9503E4E1AD9A1D5E, cn=KIRANCHANDRA DNYANESHWAR MALGAONKAR
Date: 2026.07.21 16:33:33 +05'30'

(किरणचंद्र ज्ञा. माळगांवकर)
सहायक संचालक, नगर रचना तथा
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास व गृहनिर्माण) यांचे अपर मुख्य सचिव, उपमुख्यमंत्री कार्यालय, मुंबई.
४. मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, उपमुख्यमंत्री कार्यालय, मुंबई.

५. मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९. मा.अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहायक, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. मा.अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. मा.अपर मुख्य सचिव (वने) यांचे स्वीय सहायक, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. मा. अपर मुख्य सचिव (न.वि.१) यांचे स्वीय सहायक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. मा. अपर मुख्य सचिव (न.वि.२) यांचे स्वीय सहायक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४. मा.अपर मुख्य सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. मा.अपर मुख्य सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांचे स्वीय सहायक, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. मा.अपर मुख्य सचिव (कृषी) यांचे स्वीय सहायक, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. मा. प्रधान सचिव (विधी व न्याय) यांचे स्वीय सहायक, कृषी विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. मा. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई.
१९. मा. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.
२०. सर्व विभागीय आयुक्त.
२१. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे
२२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई
२३. सर्व जिल्हाधिकारी.
२४. संचालक, नगर रचना व मुल्यनिर्धारण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२५. सर्व सहसंचालक, नगर रचना व मुल्यनिर्धारण विभाग
२६. प्रादेशिक अधिकारी, भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/नागपूर.
२७. महाराष्ट्र विमानतळ विकास कॉर्पोरेशन लि., मुंबई
२८. सर्व अधिक्षक अभियंता, (सार्वजनिक बांधकाम / जलसंपदा/ जलसंधारण)
२९. सर्व जिल्हा सरकारी वकील.
३०. निवडनस्ती (भूसंपादन-४)